# वार्तापत्र

पोलीस अधिक्षक कार्यालय,
गडचिरोली दिनांक ०९/११/२०१७

दिनांक ०७/११/२०१७ रोजी पोलीस निरीक्षक प्रदिप रामनाथ लांडे स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली यांचे गोपनिय सुत्राकडून मिळालेल्या माहितीच्या आधारे पोलीस निरीक्षक स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली यांचे मागदर्शनाखाली दिनांक ०७/११/२०१७ रोजी स्थानिक गुन्हे शाखा गडचिरोली येथील पोउपनि युवराज घोडके, सोबतचे पथकातील दादाजी करकाडे, नरेश सहारे, प्रमोद वाळके, हेमंत गेडाम, दुधराम चवारे, प्रशांत पातकमवार, दुर्गा साखरे, वैशाली चव्हाण अशा प्रकारचा पोलीस पथक वडसा (देसाईगंज) परिसरात अवैध दारु रेड संबंधाने सापळा रचुन बसले असता, बेकायदेशिर दारु वाहतुक करणारे टाटा सुमो वाहन क्रमांक एम.एच.३४ के ७२८ एक चारचाकी वाहन मौजा अर्जुनी (मोर.) ते देसाईगंज रोड दरम्यान देसाईगंज कडे येत असतांना नमुद क्रमांकाच्या वाहनास थांबवुन अवैध दारु संबंधात झडती घेतली असता, नमुद क्रमांकाचे चारचाकी वाहनाचे समोरील बॅनेट चे खाली वाहनाचो दाराचे आत मागील सिटचे खाली विशिष्ट प्रकारचे वेगवेगळे कप्पे करून वेगळी शक्क्ल लढवून दारु वाहतुक करीत असतांना मिळून आला.

१. किंमतः- ४१,४००/- रुपये इंम्पेरियल ब्ल्यु व्हिस्की कंपणीच्या १३८ सिलबंद निपा

२. किंमतः- २३,४००/- रु. देशी दारु सुप्रीम सॉनीक रॉकेट कंपणीच्या प्रत्येकी ९० मिली क्षमतेच्या ३९० सिलबंद निपा

३. किंमतः- ३,८०,०००/- रु. टाटा सुमो चारचाकी वाहन एम.एच. ३४ के ७२८ दारु वाहतुकीकरीता वापरती

असा एकुण ४,४४,८००/- रुपयाचा मुद्देमाल घटनास्थळावरुन जप्त केला. अवैध दारु विक्री करण्याकरीता बेकायदेशीर वाहतुक करणाऱ्या वाहन चालक तसेच त्याचे सोबतचे सहकाऱ्याची चौकशी केली असता, वाहन चालक विशाल नकुल वनकर, वय २७ वर्ष, रा. पोभुर्णा त्याचा सहकारी सुमीत गोकुलदास मानकर, वय-२१ वर्ष रा. पोभुर्णा जि. चंद्रपुर असे असून जप्ती केलेला अवैध दारु साठा हा वाहन चालक याचे स्वतःचे मालकीचा असल्याचे सांगितल्याने वर नमुद इसमाविरुध्द पोस्टे देसाईगंज येथे महाराष्ट्र दारुबंदी अधिनियमान्वये गुन्हा नोंद करण्यात आला आहे. स्थानिक गुन्हे शाखेकडून होत असलेल्या कारवाई मुळे गडचिरोली जिल्हयातील तसेच शेजारील चंद्रपूर जिल्हयातील अवैध दारु विक्रेते वेगवेगळया शक्क्ल लढवून बेकायदेशीर दारुची वाहतुक करीत असतांना सुध्दा त्यांच्या वेगवेगळया शक्कल हाणून पाडल्याने दारु वाहतूक करणारे इसम धास्तावलेले आहेत.

